# वानिकी आधारित शेतीपद्धती-वृक्ष लागवड

(घटक अ २ (२) (i))

**प्रस्तावना:**

हवामान बदलाचा राज्याच्या शेतीवर विपरीत परिणाम दिसून येत असून, भविष्यात देखील सदर परिणामांची व्याप्ती वाढणार असल्याचे राज्याच्या हवामान बदला विषयक कृती आराखडयामध्ये नमूद केले आहे. मराठवाडा व विदर्भातील शेतक-यांना गेल्या काही वर्षांपासून मोठया दुष्काळास सामोरे जावे लागत असून भू-गर्भातील पाणी साठयावर व जमिनीच्या आरोग्यावर विपरित परिणाम होत आहे. परिणामी शेतीमधील पिकांची उत्पादकता घटत आहे. तसेच पूर्णा नदीच्या खो-यातील भू-भाग हा निसर्गत:च क्षारपड असल्याने शेतीसाठी सिंचनास मर्यादा येत आहेत. या प्रतिकूल परिस्थितीमध्ये अल्प भू-धारक शेतक-यांच्या उत्पादनावर विपरीत परिणाम होत असल्याचे दिसून येत आहे. हवामान बदलामुळे उद्भवलेल्या परिस्थितीशी जुळवून घेण्यास शेतक-यांना सक्षम करण्याच्या उद्देशाने महाराष्ट्र शासनाचा जागतिक बँकेच्या अर्थसहाय्याने नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प सुरु करण्यात आलेला आहे.

सदर प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती-वृक्ष लागवड या घटकास प्राधान्य दिले आहे.

**उद्दिष्टे:**

नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पात समावेश करण्यात आलेल्या गावसमुहात वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड या घटकाचे उद्दिष्ट्ये खालीलप्रमाणे आहेत.

१. वातावरणातील कार्बन उत्सर्जनामुळे होणारे दुष्परिणाम कमी करण्यासाठी वृक्ष आच्छादन वाढवणे, जमिनीतील सेंद्रिय घटकांचे संवर्धन, पीक आणि पीक पद्धतीतून उत्पादकता वाढविणे.
२. शेतीपिकांना पूरक म्हणून शेतावर वृक्ष लागवडीखालील क्षेत्र वाढविणे.
३. शेतीपद्धतीवर आधारित वृक्ष लागवडीखालील क्षेत्रात वाढ करून एकमेकांना पूरक व एकात्मिक पद्धतीने पिकांची व पशुधनाची उत्पादकता वाढविणे, रोजगाराच्या संधी, उत्पन्नाच्या संधी व ग्रामीण भागातील अल्प व अत्यल्प भूधारक शेतकऱ्यांचे राहणीमान सुधारणे यासाठी प्रोत्साहन देणे.
४. विविध कृषी पर्यावरणीय प्रदेश आणि जमीन वापराच्या परिस्थितीनुसार वनशेतीसाठी अनुकूल पद्धती /आदर्श पद्धती लोकप्रिय करणे.
५. शेतीपद्धतीवर आधारित वृक्ष लागवड क्षेत्राचा विस्तार व क्षमता बांधणीसाठी सहाय्य करणे.

➢ **वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवडीच्या प्रमुख बाबी:**

शेतकऱ्यांच्या वैयक्तिक क्षेत्रावर वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड या घटकांतर्गत खालील बाबींचा समावेश आहे. **या योजनेअंतर्गत शेतकऱ्यांनी वनवृक्ष उदा.साग,ऐन,शिसम,मोह, जांभूळ,खैर,शिवन,बेहेडा ,धावडा इ.स्थानिक कृषि हवामानास अनुकूल असणाऱ्या वृक्ष प्रजातींची लागवड करणे अपेक्षित आहे .**

१. **परिघीय क्षेत्र व बांधावरील लागवड:** शेतकऱ्यांच्या शेतावरील परिघीय क्षेत्राचा व बांधाचा जास्तीत जास्त उपयोग करता यावा यासाठी परिघीय क्षेत्रावर तसेच बांधावर वृक्ष प्रजातींची लागवड करता

येईल. यामुळे शेतक-यांना अतिरिक्त उत्पन्नाच्या संधी निर्माण करण्यास तसेच बांधबंदिस्तीसाठी व जमिनीची धूप कमी करण्यास मदत होईल.

परिघीय सीमा वृक्षारोपण अंतर्गत चार वर्षांच्या कालावधीसाठी देखरेखीच्या तरतुदीसह नांग्या भरणे या बाबींचा समावेश आहे. वृक्षारोपण झालेल्या क्षेत्राचे मोजमाप / मूल्यमापन प्रति मीटर लागवड केलेल्या रोपे संख्या वरून केले जाईल.

२. **कमी घनतेची लागवड करणे**: या घटकांर्गत शेतकऱ्यांना आंतरपीक/ पट्टा पद्धत/ विरळ वृक्ष लागवड करून शेतजमिनीवर कमी घनतेचे वृक्षारोपण करता येईल. शेतकऱ्यांच्या शेतावर अस्तित्वात असलेल्या पिकांच्या उत्पादनात अथवा पीक पद्धतीमध्ये बदल न करता प्रति हेक्टर १०० ते ५०० झाडे या प्रमाणात वृक्षारोपण करण्यासाठी अनुदान देण्यात येईल.

३. **जास्त घनतेची लागवड करणे:** शेतकऱ्यांच्या शेतावर मध्यवर्ती ब्लॉक लागवड/पट्ट्यामधील लागवड/ वाऱ्याचा जोर कमी करणाऱ्या वृक्षांची जास्त घनतेची लागवड करता येईल. यामध्ये प्रति हेक्टर ५०० ते १५०० झाडे या प्रमाणात वृक्षारोपणासाठी अर्थसहाय्य देण्यात येईल. उपलब्ध जमिनीचा जास्तीत जास्त वापर होण्याच्या दृष्टीने पीक उत्पादनासाठी अयोग्य व पडीक जमिनीचा उपयोग यामध्ये करता येईल. ब्लॉक लागवड अंतर्गत प्रत्येक ब्लॉकमध्ये जास्तीत जास्त २ हेक्टर क्षेत्रापर्यंत क्षेत्रावर वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड मध्ये समाविष्ट प्रजातींचा वेगवेगळ्या अंतरावर व जास्त संख्येने लागवडीसाठी या योजनेमधून प्रोत्साहन दिले जाईल.

- <u>लाभार्थी निवडीचे निकष -</u>

 १. प्रकल्पांतर्गत निवड केलेल्या गावासाठीच्या ग्राम कृषी संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेले अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.

 २. सार्वजनिक क्षेत्रावर (ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्रावर ) ग्राम कृषी संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता दिलेल्या क्षेत्रावर लागवड करण्यात येईल .

- <u>अर्थसहाय्य:</u>

१. वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड या घटकांतर्गत परिघीय क्षेत्र/बांधावरील प्रती झाड लागवडीसाठी खालीलप्रमाणे आर्थिक मापदंड आहेत.

| अ.क्र. | घटक/बाब | प्रतीरोप किंमत (रु.) |
|---|---|---|
| १. | लागवड पूर्व तयारी/जमीन साफसफाई/ देखभाल इ. | १०.०० |
| २. | खड्डे खोदणे | ६.०० |
| ३. | प्रती रोप लागवड सामुग्री इ. | १५.०० |
| ४. | वाहतूक खर्च | १.०० |
| ५. | अत्यावश्यक निविष्ठा उदा. कुजलेले शेणखत, बीजप्रक्रिया, पिक संरक्षण | १०.०० |
| ६. | लागवड खर्च | २.०० |
| ७. | कुंपण | १०.०० |
| ८. | देखभाल (निंदनी व पाणी देणे इ. ) | १६.०० |
| | एकूण | ७०.०० |

➢ **अनुदान मर्यादा –**

१. प्रकल्पांतर्गत वैयक्तिक लाभाकरिता बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या **५० टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु.३५/- प्रती झाड** अनुदान शेतकऱ्यांना त्यांनी केलेल्या एकूण लागवडीच्या खर्चाप्रमाणे देय राहील.

२. तसेच,सार्वजनिक क्षेत्रावर (ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्रावर) वानिकी आधारित वृक्ष लागवड करण्यासाठी बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडाच्या **१०० टक्के किंवा जास्तीत जास्त रक्कम रु .७० /- प्रती झाड** इतके **अनुदान** देय आहे.

**अ) कमी घनतेच्या वृक्ष लागवडीसाठी आर्थिक मापदंड :**

| अ. क्र. | लागवडीचा प्रकार (प्रति हेक्टरी रोपे | एकूण किंमत (रु.) |
|---|---|---|
| १ | १०० पेक्षा कमी | रोपांच्या प्रत्यक्ष संख्येनुसार @ रु.७०/- प्रति रोप |
| २ | > १०० ते ५०० | २८००० ( किंवा लागवडीच्या तीव्रतेच्या प्रमाणात) |

टिप : प्रत्येक ब्लॉकमधील रोपे / वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना करण्यातयेईल.

**आ) जास्त घनतेच्या ब्लॉक वृक्षारोपण अंतर्गत आर्थिक मापदंड:**

| अ.क्र. | ब्लॉक वृक्षारोपण (प्रति हेक्टर रोपे संख्या) | एकूण किंमत (रुपये) प्रति हेक्टर |
|---|---|---|
| १ | ५०० ते १००० (अंतर ३.५ मी. X ३.५मी.) | ३०००० |
| २ | >१००० ते १२०० (अंतर ३ मी. X ३ मी.) | ३५००० |
| ३ | >१२०० ते १५०० (अंतर २.५ मी. X २.५ मी.) | ४५००० |
| ४ | >१५०० (२.५ मी. X २.५ मी.पेक्षा कमी अंतर) | ५०००० |

टिप: प्रत्येक ब्लॉकमधील रोपे / वृक्षांच्या संख्येच्या प्रमाणात खर्चाची परिगणना वर दर्शविल्यानुसार करण्यात येईल.

(**संदर्भ:** राष्ट्रीय शाश्वत शेती अभियान अंतर्गत वनशेती अभियान योजना सन- २०१८-१९: वार्षिक लक्षांक व मार्गदर्शक सूचना)

३. प्रकल्पांतर्गत बाबनिहाय मंजूर केलेल्या मापदंडानुसार देय अनुदान चार वर्षांसाठी वर्षनिहाय ४०: २०: २०: २० या प्रमाणत अदा करण्यात येईल.

४. जे लाभार्थी दुसऱ्या, तिसऱ्या व चौथ्या वर्षी कमीत कमी अनुक्रमे ९०%, ७५% व ६५% झाडे जिवंत ठेवतील त्या लाभार्थ्यांना दुसऱ्या, तिस-या व चौथ्या वर्षाचे अनुदान देय राहील.

५. लाभार्थ्यांकडे लागवड केलेल्या रोपांची मर झाल्यास लाभार्थ्याने रोखीने रोपे विकत घेऊन विहित प्रमाणात जिवंत झाडांची टक्केवारी राखावी.

➢ **<u>अंमलबजावणीतील विविध स्तरावरील जबाबदाऱ्या</u>**

**लाभार्थी**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांनी ग्राम कृषी संजीवनी समितीकडे (VCRMC) विहित नमुन्यात (प्रपत्र-१) आवश्यक कागदपत्रासहित अर्ज सादर करावा.

२. सदर घटकाचा लाभ मिळवण्यासाठी शेतकऱ्याने जमीन आरोग्य पत्रिका काढावी.
३. ग्राम कृषी संजीवनी समिती व संबधित कृषी सहाय्यकामार्फत शासकीय रोपवाटिकेतून परवानापत्राद्वारे कलमे/रोपे घ्यावीत.
४. शेतकऱ्यांनी खाजगी रोपवाटिका प्रमुखाकडे थेट संपर्क करुन रोपांची रोख खरेदी करु इच्छित असल्यास अशा शेतकऱ्यांनी रोखीने रोपे उपलब्ध करुन घ्यावीत व रोपे खरेदीची पावती सादर करावी.
५. कृषी सहाय्यकामार्फत नियोजित प्रकल्प क्षेत्राची पाहणी करून शिफारस केल्यानंतर प्रत्यक्ष कलमे/रोपे लागवड करावी व देय अनुदान मिळणेसाठी मागणीपत्र (प्रपत्र - ४) संबधित कृषी सहाय्यकामार्फत उपविभागीय कृषी अधिकारी यांच्या नावे सादर करावे.

**ग्राम कृषी संजीवनी समिती**

१. गाव समूहातील इच्छुक शेतकऱ्यांचे घटकांतर्गत बाबीचा लाभ घेण्यासाठीचे अर्ज व सादर केलेली कागदपत्रे कृषी सहाय्यक यांचे मदतीने छाननी करून अर्जाची अत्यल्प व अल्प भूधारक शेतकऱ्यांना, अनु. जाती/ जमाती, महिला, दिव्यांग व इतर शेतकरी या प्राधान्यक्रमाने निवड करून लाभ देण्यात येईल.
२. सार्वजनिक क्षेत्रावर (ग्रामपंचायत व इतर शासकीय क्षेत्रावर) सदर योजनेचा लाभ घेण्यासाठी ग्राम कृषी संजीवनी समितीने (VCRMC) मान्यता व शिफारस केलेल्या क्षेत्रावर लागवड करण्यात येईल .
३. सार्वजनिक क्षेत्रावरील केलेल्या लागवडीची देखभाल करण्याची/झाडेजिवंतठेवण्याची जबाबदारी संबधित ग्राम कृषि संजीवनी समितीची राहील .
४. इच्छुक लाभार्थ्यांचे प्राप्त अर्ज व कागदपत्रांची छाननी करून अर्जाच्या पात्र/अपात्र ते बाबत निर्णय घ्यावा . अपात्र अर्जदारांना अपात्रतेबाबत कारणासह अवगत करावे.
५. अंमलबजावणी करण्यात आलेल्या घटकांतर्गत बाबींचे सामाजिक लेखापरीक्षणास संबधित कृषी सहाय्यक/ प्रकल्प यंत्रणा यांना मदत करावी.

**समूह सहाय्यक**

१. गाव समूहातील इच्छुक लाभार्थीना नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर नोंदणी व विहित नमुन्यात अर्ज व हमीपत्र (प्रपत्र-१) भरण्यासाठी मार्गदर्शन व मदत करावी.
२. इच्छुक लाभार्थ्यांनी सादर केलेल्या कागदपत्रांची छाननी संबधित कृषी सहाय्यकासोबत करावी.
३. उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडून निर्गमित पूर्वसंमती पत्राच्या नोंदी घेणे व लाभार्थ्यास वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड या घटकाच्या अटी, शर्ती व तांत्रिक/आर्थिक निकष समजावून सांगणे.
४. रोपे लागवडीनंतर लागवड क्षेत्राची तपासणी करण्यासाठी संबधित कृषी सहाय्यक यांना अवगत करणे.
५. लाभार्थी शेतकरी व तपासणी अधिकारी यांचे समवेत प्रकल्प स्थळाचे प्रकल्प राबविण्यापूर्वी व राबविल्यानंतर अक्षांश/रेखांशसह फोटो काढावेत आणि संकेत स्थळावर अपलोड करावेत.

**कृषी सहाय्यक**

१. शेतकऱ्यांचे अर्ज व सोबत सादर केलेल्या सर्व आवश्यक कागदपत्रांची पडताळणी करणे.
२. कागदपत्रांच्या छाननी आधारे पात्र अर्जाच्या नियोजित प्रकल्प स्थळाची पाहणी करून प्रकल्प क्षेत्राबाबतचा अहवाल सोबत जोडलेल्या विहित प्रपत्रात (प्रपत्र- २) उपविभागीय कृषी अधिकारी यांचेकडे सादर करावा.
३. सर्व पात्र अर्ज, कागदपत्रे स्थळ तपासणी अहवालासहित उपविभागीय कृषी अधिकारी कार्यालयास सादर करावीत.
४. सदर योजनेच्या तांत्रिक व आर्थिक मापदंडा नुसार वैयक्तिक व सार्वजनिक लाभ देण्याकरिता विहित नमुन्यात अंदाजपत्रक तयार करण्यात यावे .
५. तांत्रीक मंजुरी प्राप्त झालेनंतर कृषी विभागाच्या शासकीय किंवा खाजगी रोपवाटिकेतून कलमे/रोपे परवानापत्राद्वारे नमूद केलेल्या रोपांचा प्रकार व संख्येनुसार शेतकऱ्यांना आवंटीत करून द्यावीत.
६. लाभार्थ्यांनी लागवड पूर्ण करताच तपासणी करुन मापनपुस्तिकेत नोंद घ्यावी व शेतकऱ्यांना द्यावयाचे अनुदानाची परिगणना करावी.
७. लाभार्थ्यांनी नियोजित प्रकल्प क्षेत्रावर कलमे/रोपे लागवड केल्यानंतर मार्गदर्शक सूचनेत दिल्याप्रमाणे योग्य असल्याबाबत तपासणी करून मोका तपासणी अहवाल (प्रपत्र- ५) देय अनुदानाच्या शिफारशीसह उपविभागीय कृषी अधिकारी यांना सादर करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे. तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी.
८. वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड घटकाच्या प्रक्रियेस अनुसरून मध्यावधी आणि अंतिम मूल्यमापनास प्रकल्प यंत्रणेला मदत करणे.

**कृषी पर्यवेक्षक**

लाभार्थी /ग्राम कृषी संजीवनी समिती (VCRMC) / कृषी सहाय्यक/ समूह सहाय्यक यांनी अवगत केल्यानंतर कृषी पर्यवेक्षक यांनी वृक्ष लागवड तपासणी करावी व याबाबतच्या मापनपुस्तिकेतील नोंदींची खात्री करून प्रमाणित कराव्यात. सोबत जोडलेल्या विहित नमुन्यात (प्रपत्र- ६) तपासणी अहवाल तयार करावा. तपासणी अहवालावर लाभार्थीची स्वाक्षरी घ्यावी व त्याखाली लाभार्थीचे नाव नमूद करावे.

**उपविभागीय कृषी अधिकारी**

१. ग्राम कृषी संजीवनी समितीच्या (VCRMC) मान्यतेने प्राप्त झालेल्या लाभार्थींच्या कागदपत्रांच्या छाननी नंतर पात्र/अपात्रते बाबत निर्णय घेऊन संबधित लाभार्थी यांना पूर्व समंती (प्रपत्र- ३) प्रदान करावी. त्याची एक प्रत ग्राम कृषी संजीवनी समितीस (VCRMC) द्यावी. लाभार्थी अपात्र असल्यास कारणे नमूद करावीत.
२. कृषी पर्यवेक्षक यांनी अनुदान प्रस्ताव व तपासणी अहवाल प्राप्त झाल्यानंतर अनुदान प्रस्ताव तपासून पडताळणी करून पात्र प्रस्तावांना उप विभागीय कृषी अधिकारी यांचेकडे परिगणना करून अनुदान अदायगीसाठी शिफारस करावी.

३. वृक्ष लागवडीच्या अंदाजपत्रकांना तांत्रिक मान्यता द्यावी.
४. तपासणी अहवालासह शिफारस झालेल्या योग्य प्रस्तावांची देय अनुदान अदायगी दहा दिवसात (निधी उपलब्धतेनुसार) DBT प्रणालीद्वारे करावी.
५. यादृच्छिक (random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या ५% तपासणी करावी.
६. लाभार्थ्यांना घटकासंदर्भात प्रशिक्षण आयोजित करणे.
७. योजनेचे सनियंत्रण करणे.

**जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी**

१. जिल्ह्यामध्ये उपविभाग स्तरावर लाभार्थी निवड व अनुदान अदायगी यासह सर्व कार्यवाही मार्गदर्शक सूचनेनुसार होत असलेबाबत वेळोवेळी पडताळणी करावी.
२. उपविभाग स्तरावर झालेल्या कामांची यादृच्छिक (random) पद्धतीने लाभार्थी संख्येच्या किमान १% तपासणी करावी व विहित प्रपत्रात अहवाल सादर करावा. तपासणी अहवालाचा नमुना सोबत जोडलेला आहे. (प्रपत्र-६)

## योजनेच्या सर्व साधारण मार्गदर्शक सूचना

१. या घटकास नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्पाच्या संकेत स्थळावर, ग्रामसभा कार्यालयातील नोटीस बोर्ड, कार्यमहिमा व मेळावे इत्यादीद्वारे व्यापक प्रसिद्धी देण्यात यावी.
२. प्रकल्पांतर्गत शासनाने ठरवून दिलेली खर्च प्रमाणके सहभागी लाभार्थ्याने मान्य करावीत. प्रमाणापेक्षा जास्त होणाऱ्या खर्चाची जबाबदारी लाभार्थ्याने स्वतः घ्यावी. त्यासाठी आवश्यक असणारी खड्डे खोदणे, खत मिश्रणाने खड्डे भरणे, रोपांची वाहतूक करणे, त्यांची लागवड करणे, रोपांना कुंपण करणे व वेळोवेळी निंदणी करून पाणी देणे इत्यादी कामे करण्याची जबाबदारी लाभार्थ्याची राहील.
३. कृषी सहाय्यक यांनी तांत्रीक मंजुरी प्राप्त करून घेऊनच प्रत्यक्ष लागवड हाती घेण्यात यावी. तांत्रिक मंजुरी शिवाय लागवड केलेले क्षेत्र अनुदानास पात्र ठरणार नाही.

# <u>प्रपत्र-१</u>

## <u>प्रकल्पांतर्गत लाभासाठी निवड होणेकरिता अर्ज व हमीपत्र</u>

## जागतिक बँक अर्थसहाय्यित

# नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प

(प्रत्येक घटकासाठी स्वतंत्र अर्ज करावा)

**प्रति,**

**मा. अध्यक्ष, ग्राम कृषि संजीवनी समिती ........................... ( अर्जदाराचे गाव) ..................................**

**गावसमूह क्रमांक..................................तालुका ............................... जिल्हा ...............................**

**महोदय,**

जागतिक बँक अर्थसहाय्यित नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मी, माझ्या मालकीहक्काचे शेत जमिनीमध्ये हवामान बदलास पुरक पध्दतीने शेती करण्यासाठी गुंतवणूक करणेस तयार आहे, त्याकरिता या प्रकल्पांतर्गत खालील घटकाचा लाभ मिळावा,ही विनंती.

**मागणी केलेल्या घटकाचे नाव-.............................................................**

**घटकाचा तपशील[१].-....................................................................**

| अ.क्र. | बाब | तपशील |
|---|---|---|
| १. | अर्जदार शेतकऱ्यांचे संपूर्ण नाव | (आडनाव) (प्रथम नाव ) (वडीलाचे नाव ) .............................. ............................. ......................... |
| २. | पूर्ण पत्ता | घर क्र. ............... गल्ली क्र./भागाचे नाव .....................<br>गाव.............................. पोस्ट..................................<br>तालुका........................... जिल्हा..............................<br>पिन क्र.- ☐☐☐☐☐☐ |
| ३. | भ्रमणध्वनी क्रमांक-[२] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ४. | स्त्री/पुरुष(लागू असेल तेथे √ अशी खूण करावी) | स्त्री ☐ पुरुष ☐ |
| ५. | जात प्रवर्ग(लागू असेल तेथे √अशी खूण करावी) | अ.जा. ☐ अ.ज. ☐ इतर ☐ |
| ६. | अर्जदार दिव्यांग आहे काय?( लागू तेथे √ खूण करावी) | होय ☐ नाही ☐ |
| ७. | दारिद्र्य रेषेखालील असल्यास - यादीतील अ.क्र[३]. | ☐☐☐☐☐☐☐☐ |

[१] या मध्ये अनुदान मागणी केलेल्या घटकाचा तपशील उदा. शेततळ्याचा आकार, हरितगृहाचा/शेडनेटचा आकार, फळबाग लागवड असल्यास फळपिक नाव, क्षेत्र इ. तसेच ठिबक, तुषार असल्यास- पिकाचे नाव-क्षेत्र इ. तपशील नमूद करावा.

[२] प्रकल्पाच्या विविध घटकातील माहितीची देवाण-घेवाणीसाठी भ्रमणध्वनी क्रमांकाचा प्रकल्पाच्या कामकाजासाठी वापर करण्यास माझी सहमती आहे.

[३]दारिद्र्य रेषेखालील दाखला सोबत जोडण्याची आवश्यकता नाही. तथापि ग्राम कृषी संजीवनी समिती लाभार्थी निवड करतेवेळी अर्जदार दारिद्र्य रेषेखालील असल्याबाबत खात्री करून अर्जाबाबत उचित निर्णय घेऊ शकेल.

| | | |
|---|---|---|
| ८. | आधारकार्ड क्र.[४] | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ९. | स्वत:च्या नावावरील एकूण क्षेत्र (८-अ प्रमाणे) | खाते क्र........................... <br> एकूण जमिनधारणा ☐ (हेक्टर) ☐ (आर) |
| १०. | आरटीजीएस सुविधा असणाऱ्या बँकेचे नाव | |
| | खाते क्रमांक- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| | बँकेची शाखा- | |
| | आयएफएससी कोड- | ☐☐☐☐☐☐☐☐☐☐☐ |
| ११. | घेत असलेली पिके- | |
| १२. | ज्या क्षेत्रावर घटक राबविणार आहे त्या क्षेत्राचा सर्व्हे क्रमांक- | |
| १३. | यापूर्वी याच घटकाचा लाभ आपण अथवा आपल्या कुटुंबातील[५] अन्य सदस्यांनी या किंवा इतर योजनेतून घेतला आहे काय? असल्यास लाभ घेतलेली योजना,अनुदान रक्कम व लाभ घेतलेचे वर्षे इ.तपशील . | |
| १३. | मागणी केलेल्या घटकाचा एकूण अंदाजित खर्च. | रक्कम रुपये.............................. |
| १४. | निकषानुसार अपेक्षित  अनुदान | रक्कम रुपये.............................. |
| १५. | अनुदान वजा जाता उवर्रित रक्कम कशा प्रकारे उभारणी करणार ? ( लागू असेल तेथे √ अशी खूण करावी) | स्वत: ☐ बँक कर्जाव्दारे ☐ |

सदर घटकासाठी माझी निवड झाल्यास आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करुन विहीत मुदतीत प्रकल्पाच्या मार्गदर्शक सूचनेनुसार तसेच प्रकल्प आधिकाऱ्यांच्या तांत्रिक देखरेखीखाली काम पूर्ण करीन व त्यानंतरच मला अनुदान देय राहील. तसेच सदरचे काम मी विहित मुदतीत व मार्गदर्शक सुचनेप्रमाणे पूर्ण न केलेस अनुदान मिळणार नाही, याची मला जाणीव आहे.

सदर बाबीचा लाभ घेत असताना वा त्यानंतर माझेकडुन गैरव्यवहार झाल्याचे आढळून आल्यास अथवा लाभांकित बाबीचा माझ्याकडुन गैरवापर झाल्याचे सिद्ध झाल्यास संबधित घटकासाठी मिळालेले अनुदान माझ्याकडून सव्याज वसुल केले जाईल याची मला स्पष्ट जाणीव आहे.

प्रकल्पाचे अधिकारी आणि इतर प्राधिकृत व्यक्तींना  घटक तपासणीसाठी माझी संमती आहे तसेच, त्यांना या तपासणी कामासाठी सहकार्य करेन.

वरील सर्व माहिती माझ्या समजुतीप्रमाणे बरोबर व खरी आहे.

स्थळ:- (गावाचे नाव).............................

दिनांक-     /     / २०--                                                            **अर्जदार शेतक-याची सही**

---

कोठेही जतन अथवा सामाईकीकरण (share) केली जाणार नसून ती फक्त सी आय डी आर (Central Identities Data Repository) कडे पडताळणी करता सादर केली जाईल.

कुटुंब या व्याख्येत पती, पत्नी व १८ वर्षाखालील मुलांचा समावेश राहील.

## प्रपत्र – २

( प्रकल्प स्थळ पाहणी व पात्रतेबाबत अभिप्राय )

श्री/ श्रीमती-------------------------------------------मु. पो.----------------- ता.----------- जि.------------------ यांनी त्यांचे मालकीचे स.नं./गट नं. -----------मधील एकूण क्षेत्र -------------(हे. आर.) पैकी -------------(हे. आर.) क्षेत्रावर नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती कलमे /रोपे लागवड घटकासाठी अर्ज केलेला आहे. यापूर्वी सदर घटकाचा इतर शासकीय योजनेतून लाभ घेतलेला आहे/नाही. सदर अर्ज ग्राम कृषि संजीवनी समितीने (VCRMC) दिनांक -------रोजीच्या बैठकीमध्ये मंजूर केलेला आहे. सदर लाभार्थी योजनेच्या निकषाप्रमाणे पात्र आहे. दिनांक --------------- रोजी भेट देऊन प्रस्तावित प्रकल्प स्थळाची लाभार्थी समक्ष पाहणी केली असता घटकासाठी आवश्यक व योग्य क्षेत्र लाभार्थ्याकडे उपलब्ध असून प्रकल्प राबविण्यासाठी लाभार्थी सक्षम व पात्र आहे.

उपरोक्त लाभार्थ्याने अर्जासोबत सादर केलेल्या ८-अ मध्ये नमूद इतर गट नं./सर्वे नं. मध्ये पाहणी केलेली असून सदर गट नं./सर्वे नं. मध्ये कलमे/रोपे लागवड अस्तित्वात आहे/नाही.

असल्यास, वृक्ष/रोपे लागवड केलेले क्षेत्र गट नं./सर्वे नं.-----------------असून त्याचे क्षेत्रफळ --------- चौ.मी. आहे. सदर वृक्ष लागवडीसाठी -------------------------------------- योजनेतून अर्थसहाय्य देण्यात आलेले आहे/नाही. त्यामुळे सदर लाभार्थ्यास पूर्वसंमती देणेस शिफारस करणेत येत आहे.

| | |
|---|---|
| **ठिकाण** | **(स्वाक्षरी)** |
| **दिनांक** | **कृषि सहाय्यक** |
| | **नाव** |
| | **सज्जा** |
| | **ता.** |
| | **जि.** |

(कृषी सहाय्यक यांनी मार्गदर्शक सूचनेतील जागा निवड या बाबतच्या सविस्तर सूचनांचा अवलंब करून उपरोक्त स्थळ तपासणी अहवाल भौगोलिक चिन्हांकनासह (Geo-tagging) द्यावा.)

## प्रपत्र - ३
## पूर्वसंमती पत्र
( पुर्वसंमती पत्राचा नमूना )

जा.क्र. -----------------
कार्यालय- उपविभागीय कृषि अधिकारी, ______
उपविभाग ________, जिल्हा________
दिनांक - / /२०१८

प्रति,
श्री/श्रीमती---------------------------------------------------मु.पो.------------------
तालूका -------------------- जिल्हा -------------

आपल्या दिनांक ------------- रोजीच्या अर्जाप्रमाणे वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड प्रस्तावास नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत मार्गदर्शक सूचनेनुसार अनुज्ञेय रकमेसाठी पूर्वसंमती देण्यात येत आहे. आपण सादर केलेल्या हमीपत्रात यापूर्वी वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड या घटकासाठी_________ लाभ घेतल्याचे नमूद केलेले आहे. सदरचे पूर्वसंमती पत्र दिल्याच्या तारखेपासून ४५ दिवसात कलमे/रोपे उपलब्ध करून लागवड न केल्यास आपणास दिलेली पूर्वसंमती आपोआप रद्द समजण्यात यावी. सदर प्रकल्प उभारणीसाठी लाभार्थ्याने सर्व खर्च अगोदर करावयाचा आहे. तसेच लागवडीनंतर १५ दिवसात अनुदान मागणीचा परिपूर्ण प्रस्ताव सादर करावा. याबाबतचा अनुदान मागणी प्रस्ताव दिलेल्या मुदतीत सादर न केल्यास आपणास अनुदान मागणीचा हक्क राहणार नाही याची नोंद घ्यावी.

प्रकल्प उभारणी मार्गदर्शक सूचनेनुसार पूर्ण झाल्याची खात्री झाल्यानंतर आपणास शासन निर्णयानुसार (मार्गदर्शक सुचना व मंजूर मापदंड इत्यादी) अनुज्ञेय अनुदान निधी उपलब्धते नूसार मंजूर करण्यात येईल. तसेच सदरचे अनुदान आपल्या बँकखात्यावर जमा करण्यात येईल. आपल्या प्रकल्प प्रस्तावास मंजूरी देणे, देय अनुदानाची रक्कम/ देय कालावधी इत्यादी बाबी ठरविण्याचा अंतिम अधिकार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्प/ शासनाचा राहील.

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग ________**
**जिल्हा: ________**

## प्रपत्र -४
## (लाभार्थी अनुदान मागणी पत्र)

**प्रती,**

**उपविभागीय कृषि अधिकारी,**
**उपविभाग _________**
**जिल्हा: _________**

**विषय :- नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत देय अनुदान मिळणेबाबत.**

मी श्री. / श्रीमती..............................................................मु. ...............पो. ................ ता.............. जि.............. आपणास मागणी करतो की, मला मिळालेल्या -----------रोजीच्या पूर्व संमतीनुसार नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड या घटकांतर्गत कलमे/रोपे ------------------------------------रोपवाटीकेवरून खरेदी करून मार्गदर्शक सूचना व मापदंडानुसार लागवड केलेली आहे. तरी मला नानाजी देशमुख कृषि संजीवनी प्रकल्पांतर्गत वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड या घटकांतर्गत आर्थिक निकषानुसार देय अनुदान मिळावे. ही विनंती

**दिनांक :** **लाभार्थीची स्वाक्षरी**
**(नाव व पत्यासह)**

सोबत –

१. खरेदी देयकांच्या मूळप्रती

## प्रपत्र - ५
## मोका तपासणी अहवाल
## (कृषि सहाय्यक यांनी करणे)

<table>
<tr><th>अ.क्र.</th><th colspan="2">बाब</th><th>तपशील</th></tr>
<tr><td>१.</td><td colspan="2">लाभार्थ्याचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>२.</td><td colspan="2">गावाचे नाव</td><td></td></tr>
<tr><td>३.</td><td colspan="2">तपासणी दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>४.</td><td colspan="2">बाब</td><td>वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड</td></tr>
<tr><td>५.</td><td colspan="2">पूर्वसंमती क्र.व दिनांक</td><td></td></tr>
<tr><td>६.</td><td colspan="2">जमिनीचा प्रकार (हलकी/मध्यम/भारी/कातळ/पडीक)</td><td></td></tr>
<tr><td>७.</td><td colspan="2">ओलिताचे साधन (विहीर, लिफ्ट, कॅनॉल, नदी इ.)</td><td></td></tr>
<tr><td>८.</td><td colspan="2">ओलिताचे साधन नसल्यास लागवडीपासून पहिल्या दोन/तीन वर्षात पाण्याची व्यवस्था कोणत्या प्रकारे करण्यात येणार आहे?</td><td></td></tr>
<tr><td>९.</td><td colspan="2">कलमे/रोपे खरेदीचे ठिकाण</td><td></td></tr>
<tr><td>१०.</td><td>वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड बाबतचा तपशिल</td><td>१ लागवडीचे वर्ष<br>२ रोपे/कलमांची एकूण संख्या<br>३ जिवंत रोपे/कलमांची एकूण संख्या<br>४ झाडांची सरासरी उंची (सेंमी)<br>५ झाडांचे अंतर (सेंमी)<br>६ बांधाची लांबी (मी.)/लागवडीचे क्षेत्र (हे. आर.)</td><td></td></tr>
<tr><td>११.</td><td colspan="2">वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड अंतर्गत बाबींची खरेदी मार्गदर्शक सूचनेप्रमाणे आहे काय ?</td><td>होय/नाही</td></tr>
<tr><td>१२.</td><td colspan="3">अनुदानाची गणना: (रोपे/कलमे यांची संख्या, दर, अनुदान मर्यादा, देय अनुदान इत्यादी बाबी विचारात घेऊन देय अनुदानाची शिफारस करावी.)<br>शिफारस केलेल्या अनुदानाची रक्कम रु. -----------</td></tr>
</table>

वानिकी आधारित शेतीपद्धती- वृक्ष लागवड या घटकांतर्गत कलमे/रोपांची लागवड मार्गदर्शक सूचनेनुसार असून इतर बाबींतही मार्गदर्शक सूचनांचा अवलंब केला असलेने लाभार्थ्यास अनुदान अदा करण्यास शिफारस करण्यात येत आहे.

समक्ष-

**लाभार्थ्याचे नाव व स्वाक्षरी** **स्वाक्षरी कृषि सहाय्यक**

**(श्री. )** **दिनांकीत स्वाक्षरी**

( टिप-सदर तपासणी अहवालाची एक प्रत लाभार्थ्यास द्यावी)

## प्रपत्र – ६
## पर्यवेक्षीय तपासणी अहवाल

| | | |
|---|---|---|
| १. | तपासणी दिनांक | |
| २. | तपासणी अधिकारी | श्री/श्रीमती |
| ३. | पदनाम | |
| ४. | तपासणी वेळी उपस्थित इतर अधिकारी | १. श्री/श्रीमती<br>पदनाम<br>२. श्री/श्रीमती<br>पदनाम |
| ५. | लाभार्थ्याचे नाव | सर्वे नं<br>वर्गवारी: ___________<br>(अ.जा./अ.ज./सर्वसाधारण)<br>मु.पो.<br>ता. उपविभाग<br>जि. |
| ६. | बाब | वानिकी आधारित शेतीपद्धती वृक्ष लागवड अंतर्गत रोपे/कलमे |
| ७. | सेवा पुरवठादाराचे नाव व पत्ता | |
| ८. | प्रकल्पाचे ठिकाण | |
| ९. | लागवडीचे वर्ष | |
| १०. | लागवडीचे क्षेत्र (हे. आर.) | |
| ११. | प्रकल्पाचा मोका तपासणी तपशील | १. रोपे/कलमांची एकूण संख्या ---------------<br>२. जिवंत रोपे/कलमांची एकूण संख्या ----------<br>३. झाडांची सरासरी उंची --------------(सेंमी)<br>४. झाडांमधील अंतर ------------------ (सेंमी) |

| | | |
|---|---|---|
| १२. | लाभार्थ्यास देण्यात आलेल्या अर्थसहाय्याची रक्कम रु. | |
| १३. | तपासणी मध्ये अर्थसहाय्याची परिगणना बरोबर केलेली आहे काय ? | **होय/नाही** |
| | नसल्यास तफावत रक्कम रु. | |
| १४. | मार्गदर्शक सूचनेप्रमाणे कार्यवाही करण्यात आलेली आहे काय ? | **होय/नाही** |
| १५. | लाभार्थ्याचे सर्वसाधारण अभिप्राय | |
| | | |
| १६. | गुणवत्तेबाबत तपासणी अधिकाऱ्याचे अभिप्राय | |
| | | |

**तपासणी अधिकारी, श्री.**

**पदनाम.**

**(स्वाक्षरी)**

**इतर अधिकारी श्री.**

**पदनाम.**

**(स्वाक्षरी)**

**लाभार्थ्याची/ लाभार्थी प्रतिनिधीची स्वाक्षरी**

**(नाव...................)**